पारनेर दर्शन

वर्ष १ अंक २९१, बुधवार ७ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

जलसंपदा विभागाची मंत्रालय स्तरावर बैठक आयोजित करा

खासदार नीलेश लंके यांचे देवेंद्र फडणवीस यांना पत्र

नगर : प्रतिनिधी

नगर दक्षिण मतदारसंघातील जलसंपदा विभागातील कामासबंधी मंत्रालय स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यासंदर्भात खा. नीलेश लंके यांनी उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे.

नगर लोकसभा मतदारसंघातील जलसंपदा विभागाच्या अनुषंगाने काही समस्या तसेच कामकाजासंबंधी फडणवीस तसेच आपल्या उपस्थितीमध्ये अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्याची विनंती खा. लंके यांनी केली आहे. कुकडी डावा कालवा किमी २६ ते १६५ मजबुतीकरण करणे, पिंपळगांव जोगा डावा कालवा गळती प्रतिबंधक कामे करणे, शेवटच्या भागातील अस्तरीकरण करणे, वडझिरे ते शिवडोह लिंक कॅनलच्या कामामधील अडथळे दुर करणे, चाऱ्यांची अपूर्ण कामे पुर्ण करणे, पाझर तलाव व बंधाऱ्यांनी दुरूस्ती करणे, पाणी वापर संस्था सक्षमीकरण करणे व अनुदान देणे, पिंपळगांव जोगा धरणात पुर्ण क्षमतेने पाणी साठा करणे, डिंभे ते माणिकडोह धरणापर्यंत बोगद्याच्या कामामधील अडथळे दुर करून कामास मान्यता देणे, कोकण विकास महामंडळाकडून पाणी उपलब्धतेबाबत ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत कार्यवाही करणे, राळेगणसिध्दी व इतर ९ गावांच्या पाणी पुरवठा योजनांना मान्यता देणे, साकळाई उपसा सिंचन योजना, कर्जत-जामखेड उपसा सिंच योजना, म्हाळसाकांत उपसा सिंचन योजना आदींबाबत चर्चा करणे, निर्णय घेणे व निधी उपलब्ध करून देण्याबाबत या बैठकीचे जलसंपदा विभागाकडून आयोजन करण्यात यावे अशी विनंती खा. लंके यांनी या पत्राद्वारे फडणवीस यांच्याकडे केली आहे.

या बैठकीस आपल्यासह विधानसभा सदस्य अतुल बेनके, बबनराव पाचपुते, रोहित पवार, जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीचे अध्यक्ष, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक, पुणे येथील जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता व अन्य संबंधित मंत्रालयीन व क्षेत्रीय अधिकारी यांना निमंत्रीत करण्यात येउऊन या बैठकीचे लवकरात लवकर आयोजन करण्यात यावे अशी विनंती खा. लंके यांनी पत्राद्वारे केली आहे.

तपश्चर्या करा, यश तुमचेच!

जंगले महाराज शास्त्री यांचा कानमंत्र । तिरूपती टायर्सचे उद्घाटन

■ पारनेर शहरातील औटी परिवाराच्या तिरूपती टायर्स या दालनाचे हभप जंगले महाराज शास्त्री यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

पारनेर : प्रतिनिधी

कोणत्याही क्षेत्रात एक तप जावे लागते. एका तपानंतर कोणत्याही गोष्टीचा फायदा मिळतो. दोन, पाच वर्षात मिळत नाही. बारा वर्षे तपश्चर्या करावी लागते. निष्कामता, सेवा भाव असेल तर काही अडचण येणार नाही. समाज म्हणजेच पांडूरंग तुमच्या पाठीशी उभा असल्याने यश तुमचेच असल्याचा कानमंत्र जंगले महाराज शास्त्री यांनी दिला.

पारनेर शहरातील नामदेव औटी, मयुर औटी, ओंकार औटी यांच्या तिरूपती टायर्स या दालनाचे हभप जंगले महाराज शास्त्री यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. राणीताई लंके, काशिनाथ दाते, सुजित झावरे, विश्वनाथ कोरडे, अशोक चेडे, सचिन शेटे, स्वप्निल पुजारी, सहदेव तराळ, अण्णासाहेब औटी, किसन गंधाडे, बबन शेख, रमेश पुजारी, बाळासाहेब पुजारी, जयश्री उदावंत, उमाताई बोरूडे, सोनाबाई चौधरी, पुजा चौधरी, भारती औटी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावून औटी परिवारास शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना जंगले महाराज शास्त्री म्हणाले, आज कुटूंबामूध्ये माणसांपेक्षा गाडयाचा जास्त झाल्या आहेत. कुटूंबात दोन माणसे असतील तर त्यांच्याकडे चार गाडया असतात. वाहनांना काही ना काही अडचण निर्माण होतेच. त्यासाठी पारनेरहून नगरला जावे लागत असे. त्यासाठी औटी परिवाराने पारनेरमध्येच अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिली ही आनंदाचा बाब आहे. हा व्यवसाय पाहणारा ओंकार हा इंजिनिअर आहे. अशी जाणती माणसंच या व्यवसायात आवष्यक असतात असे जंगले महाराज शास्त्री म्हणाले.

डोक्यावर बर्फ, तोंडात खडीसाखर ठेवा

शक्यतो बहुजन समाज व्यवसायात पडत नाही. पडला तरी त्याचा व्यवसाय टीकत नाही. टिकला तरी त्यांच्याकडून पाहिजे तशी व्यवस्था राहत नाही. क्षत्रीय रक्त आणि व्यवसायीक रक्त यात फरक आहे. व्यवसाय करताना डोक्यावर बर्फ आणि तोंडात खडीसाखर ठेवावी लागते. खरं-खोटं कधी कधी बाजूला ठेवावं लागतं. व्यवसाय करताना शहाणे, अती शहाणे, दिड शहाणे, मुर्ख, महामुर्ख ही सगळी माणसं समोर येत असतात. सगळयांना सारखीचा वागणूक देउन चालत नाही. बऱ्याच वेळा तडजोड करावी लागते. आपलं क्षत्रीय रक्त असल्याने एखाद्या प्रसंगी ग्राहकाच्या श्रीमुखात भडकवली जाते. ते व्यवसायात चालत नसल्याचा सल्ला जंगले महाराज शास्त्री यांनी यावेळी दिला.

सेवाभाव, सामर्थ्य, संघटन हवे

व्यवसाय करताना माणसं जोडणे फार महत्वाचे असते. व्यवसायात सेवाभाव महत्वाचा असतो. सेवाभावाबरोबरच सामर्थ्य, संघटनाची आवष्यकता असते, त्यामुळेच तो व्यवसाय चांगला चालतो. व्यवसायात कष्ट फार असतात. नित्य नियम महत्वाचा असतो. दोन दिवस दुकान उघडले आणि चार दिवस फिरायला गेला असे चालत नाही. ग्राहक असो वा नसो, व्यवसाय सुरू ठेवावाच लागतो. घडयाळ सांभाळावेच लागते. दुकानात गेल्यानंतर माझे काम होणार असा विश्वास संपादन केला पाहिजे. जितकी माणसे जोडता येतील तितकी व्यवसायाची भरभराट होईल. शक्ती लावा, कष्ट करा, माणसाचा विश्वास संपादन करा, सत्यता ठेवा असे सांगतानाच जिवनात सत्यता हारपली तर त्याचे जिवन संपते, व्यवसाय संपतो असेही जंगले महाराज म्हणाले.

निष्काम सेवा महत्वाची

निष्काम सेवा करणे महत्वाचे असते. मी आतापर्यंत हजारो किर्तनकार तयार केले.रामायणकार, कथाकार, उत्तम गायक, वादक तयार केले, मात्र मला कोणी एक रूपयाही दिला नाही. कोणाचे पाच रूपये घेतले नाही की पायलीभर गहू घेतले नाहीत. कोणत्या विद्यार्थ्याकडून रूपया घेतला नाही. गेल्या चाळीस बेचाळीस वर्षात निष्काम भावनेतून सेवा केली. या सेवेला समाजाने स्विकारले.

हभप जंगले महाराज शास्त्री
डोंगरगण

पारनेर धार्मिक तालुका

पारनेर तालुका हा धार्मिक तालुका आहे. नगर जिल्हयात सर्वात धार्मिक तालुका म्हणून या तालुक्याची ओळख आहे. पारनेर दहा पंधरा वर्षापूर्वी खेडे होते आज ते शहर झाले आहे. हे पाहून खूप समाधान वाटत असल्याचे जंगले महाराज शास्त्री यांनी यावेळी सांगितले.

पारनेरच्या तहसिलदारांविरोधात अवमान याचिका दाखल

■ तहसिलदारांना छ.संभाजीनगर उच्च न्यायालयाची नोटीस ■ २७ ऑगस्टला सुनावणी

छ. संभाजीनगर : प्रतिनिधी

मुंबई उच्च न्यायालयाच्या छ. संभाजीनगर खंडपीठाच्या निकालानंतर अद्यापही शिव पाणंद शेतरस्त्यांच्या प्रश्नांची प्रशासकीय पातळीवर नोंद घेतली गेली जात नाही ही खेदाची बाब असून प्रशासकीय अधिकारी कागदोपत्री कृती आराखडे तयार करून शेतकऱ्यांची दिशाभूल करत असल्याचे सातत्याने समोर आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे छ. संभाजीनगर खंडपीठाने सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर निर्णय देताना ६० दिवसांच्या आत शिव शेत पानंद रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्या संदर्भात प्रशासकीय अधिकाऱ्यांना आदेशित केले होते.

१७ जुलै २०२३ च्या हायकोर्टाच्या निकालाला १ वर्ष पुर्ण होवूनही सदर आदेशाची अंमलबजावणी झाली नसल्याने अखेर शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांच्या लढ्यानंतर हायकोर्टच्या निर्णयाने आनंदीत झालेल्या शेतकऱ्यांना पुन्हा हाय कोर्टाचा अवमान केल्याकारणाने सदर प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या विरोधात उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्याची मागणी ॲड. प्रतिक्षा काळे(मुंबई उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर) यांच्याकडे केली. असता शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व हायकोर्टाचा अवमान केल्या कारणाने अखेर पारनेर तहसिलदारांविरोधात अवमान याचिका दाखल करण्यात आली असता दि.५ऑगस्ट २०२४ रोजी पारनेर तहसिलदारांना कोर्टाने नोटीस बजावली असून पुढील सुनावणी २७ ऑगस्टला २०२४ रोजी होणार आहे.

या सुनावणीकडे पारनेर तालुक्यासह श्रीगोंदा, संगमनेर, राहुरी, नेवासा, कर्जत, श्रीरामपुर आदी तालुके, नगर जिल्ह्यातील शेतरस्तेपिडीत शेतकरी यांसह महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील शिवपानंद शेतरस्ता चळवळीच्या शेतकऱ्यांचे लक्ष लागले असून शेतकऱ्यांची बाजु ॲड. प्रतिक्षा काळे सक्षमपणे मांडत आहेत.

भविष्यात शेवटच्या शेतकऱ्याला दर्जेदार शेतरस्ता जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत प्रशासकीय, न्यायालयीन, जनआंदोलन, जनजागृतीच्या माध्यमातून संघर्ष करत राहणार असल्याचे महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी सांगितले.

विधानसभेत मराठ्यांचीच सत्ता येणार!

■ सरकारला शेवटची संधी ■ आम्ही राजकारणात उतरलो तर हाल होतील ■ मनोज जरांगे यांचा इशारा

जालना : प्रतिनिधी

विधानसभेत मराठ्यांची सत्ता येणार आहे. या निवडणुकीत सत्तापालट होणार आहे. आम्हाला राजकारणात उतरायचे नाही. मात्र सरकारने आता आरक्षण न दिल्यास दुसरा पर्याय नाही. आम्ही राजकारणात उतरलो तर हाल होतील असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी दिला आहे. तसेच राज्यभरातील मराठा समाजाच्या आमदारांनी सरकारला समजावून सांगावे असे आवाहनही त्यांनी केले आहे. ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.

यावेळी बोलताना मनोज जरांगे यांनी सरकारला इशारा दिला आहे. ते म्हणाले, सध्या मराठा समाजाचे आंदोलन सुरू नाही. समाजाने संयम धरला पाहिजे. सध्या काही लोकांकडून समाजाला उचकवण्याचे काम सुरू आहे. सर्व जण स्वतःचा पक्ष वाचवण्यासाठी माझ्यावर तुटून पडले आहेत. मग ते भुजबळ यांच्यासारखे ओबीसी नेते असो किंवा भाजपचे मराठा आमदार, हे सर्व षडयंत्र आहे. आंदोलन करायला लावण्यासाठी हे एक षडयंत्र आहे, असा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे.

पुढे जरांगे म्हणाले, कारण नसताना वातावरण दूषित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कोणी काहीही बोलले तरी समाजाने आंदोलन करण्याची गरज नाही. ज्या दिवशी जाब विचारायचा असे वाटेल त्या दिवशी सामाज काय करतो हे बघा असे म्हणत जरांगे यांनी सरकारला इशारा दिला आहे. तसेच येणाऱ्या विधानसभेत मराठ्यांची सत्ता येणार आहे. या निवडणुकीत सत्तापालट होणार आहे असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत राज्यातील मराठा आमदारांची बैठक झाल्याचे बोलले जात आहे. याबाबत बोलताना जरांगे म्हणाले, सगळ्याच पक्षातील मराठ्यांच्या आमदारांनी सरकारला समजावून सांगवे. आम्हाला राजकारणात जायचे नाही. त्यात आम्हाला ढकलू नका. ही सरकारला शेवटची संधी आहे. कारण आरक्षण देण्याचे केंद्र सत्ता असते. सध्या सत्ता त्यांची आहे. आम्हाला आरक्षण दिले नाही तर आमच्याकडे दुसरा पर्याय नाही. २९ तारखेला याबाबत निर्णय होईल. मराठा समाजाला हीच राजकारणाला पायाखाली तुडवायची योग्य वेळ आहे असे वाटले तर निर्णय होईलच. कारण आमचाही नाईलाज असेल, असे जरांगे म्हणाले.

मराठा समाजाला ताकदीने एकत्र येण्याचे आवाहन

यावेळी जरांगे यांनी मराठा समाजाला ताकदीने एकत्र येण्याचे आवाहन देखील केले आहे. ते म्हणाले, सध्या चारही बाजूने सरकारने आणि सत्ताधारी भुजबळ यांच्यासारख्या नेत्यांनी मला उघडे पाडण्याचा प्रयत्न केल्याचे समाजाच्या लक्षात आले आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यांतील समाज ताकदीने एकत्र झाला आहे. आता रॅलीतून सरकारला समाजाची ताकद दिसणार आहे. मराठा समाजाला आवाहन आहे सर्वांनी एक दिवस प्रत्येक जिल्ह्यातील रॅलीत सहभागी व्हा, एक दिवस दिला तर समाजाचे कल्याण होणार आहे. ज्या ज्या जिल्ह्यांत या रॅली आहेत तिथे सर्व मराठा समाजाने एकजुटीने यायचे आहे, असे जरांगे म्हणाले.

आमदार अपात्रतेची सुनावणी २ आठवड्यांनी पुढे ढकलली

तारीख पे तारीखचा सिलसिला सुरूच !

नवी दिल्ली : वृत्त संस्था

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी २ आठवड्यांनी पुढे ढकलण्यात आलेली आहे. या प्रकरणात अजित पवार गटाकडून सर्वोच्च न्यायालयात उत्तर दाखल करण्यासाठी अधिकचा वेळ मागण्यात आला. अजित पवारांच्या वकिलांनी केलेली मागणी सर्वोच्च न्यायालयानं मान्य केली. त्यामुळे या प्रकरणात तारीख पे तारीख सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे.

सर्वोच्च न्यायालयात आज एकूण १४ प्रकरणांवर सुनावणी आहे. यामध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादीचं आमदार अपात्रता प्रकरण सातव्या क्रमांकावर होतं. आधी शिवसेना आणि मग राष्ट्रवादीच्या आमदार प्रकरणांवर सुनावणी झाली. मागील सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयानं अजित पवारांसह त्यांच्या ४१ आमदारांना उत्तर दाखल करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं दिले होते. पण या आमदारांनी अद्यापपर्यंत उत्तर दाखल केलेलं नाही. राष्ट्रवादीच्या आमदारांना उत्तर दाखल करण्यासाठी ३ आठवड्यांचा वेळ देण्यात यावा, अशी मागणी अजित पवारांचे वकील नीरज किशन कौल यांनी न्यायालयाकडे केली. त्यांची विनंती मान्य करण्यात आली. त्यामुळे अजित पवार गटातील आमदारांकडे आता उत्तर दाखल करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळाला आहे. सर्वोच्च न्यायालयानं सुनावणी पुढे ढकलताना वकील कौल यांना फटकारलं.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी शिंदे गट आणि अजित पवार गटातील कोणालाही अपात्र ठरवलं नाही. त्यांच्या निर्णयाला शिवसेनेच्या ठाकरे गटानं आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटानं सर्वोच्च न्यायालयात दोन वेगवेगळ्या याचिकांच्या माध्यमातून आव्हान दिलं. त्यावर

उर्वरीत पान ३ वर

युवा

परफेक्ट निवडताना!

लग्नासाठी परफेक्ट स्थळ निवडणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. जर तुम्ही लग्न अगदी पारंपरिक पद्धतीने करत असाल म्हणजे अगदी वधूवर सुचक मंडळात जाऊन तुम्ही नाव नोंदवले असेल तर अशावेळी स्थळ निवडताना खूपच जबाबदारीपूर्वक काम करावे लागते. कारण बरेचदा लग्न जुळवताना फसवणुकीचे किस्से तुम्हीही ऐकले असेल. लग्न करण्यापूर्वी सांगितलेल्या बऱ्याच गोष्टी या खोट्या सांगितल्या जातात. या गोष्टी लग्न झाल्यानंतर कळतात. अशावेळी परफेक्ट आणि अचूक स्थळ निवडताना किंवा कोणताही निर्णय घेण्याआधी या गोष्टी नक्कीच लक्षात घ्यायला हव्यात...

■ स्थळांची करा पडताळणी : तुम्हाला आलेल्या कोणत्याही स्थळाची पडताळणी करणे हे सगळ्यांसाठीच फार महत्वाचे असते खूप जण स्थळांची पडताळणी म्हणावी तशी करत नाही. वर वर पाहता एखादी व्यक्ती चांगली दिसली की त्याची चौकशी करणे सोडून देतात. हल्ली मोबाईल आणि डेटला जाणे अधिक पसंत केले

जाते. त्यामुळे होते असे की, वर वर पाहता एखादी व्यक्ती सुंदर दिसली की त्या व्यक्तीच्या प्रेमात पडल्यासारखे होते. प्रेम ही अशी गोष्ट आहे जी झाल्यानंतर स्थळामध्य असलेली एखादी खोटही तुम्ही दुर्लक्षित करता असे मुळीच करु नका. सगळ्यात आधी तुम्ही स्थळ योग्य तपासून घ्या. त्याचे वय, कुटुंब, मिळकत, नोकरीचे ठिकाण, राहण्याचे ठिकाण, घेतलेल कर्ज या गोष्टींची माहिती असणे हे फारच गरजेचे असते. जर या गोष्टी माहीत करुन न घेता तुम्ही लग्नाचा निर्णय घेतला तर तो तुम्हाला भारी पडू शकतो.

■ पत्रिका घ्या पाहून : पत्रिका पाहणे हे आताच्या जनरेशनसाठी फारच जुनी अशी पद्धत आहे. प्रेमविवाह केला असेल तर अशावेळी पत्रिका पाहिलीसुद्धा जात नाही. पण अरेंज मॅरेज किंवा जुळवून लग्न करताना पत्रिका पाहणे हे फारच महत्वाचे ठरते. खूप जणांना पत्रिकेतील बऱ्याच गोष्टी जाणून घ्यायच्या असतात. पत्रिकेतील नाडी, रास, लग्न रास, असलेली एखादी समस्या जाणून घेणे खूपच महत्वाचे असते. जर तुमच्याकडे कोणी पत्रिका मागत असेल तर त्यांना तुम्ही अवश्य पत्रिका द्या. गूण जुळत असतील किंवा नसतील तरीदेखील त्यामधला काही मार्ग नक्कीच काढता येतो. त्यामुळे जर तुम्हाला यावर विश्वास असेल तर तुम्ही अवश्य पत्रिका बघा. म्हणजे तुमच्या मनाचे समाधान होईल.

■ देवाण घेवाणाची बोलणी : देवाण घेवाणाची बोलणी ही देखील लग्नासाठी फार महत्वाची असते. खूप ठिकाणी लग्नाचा खर्च हा अर्धा अर्धा केला जातो. तर काही ठिकाणी मुलींनी सगळे लग्न करावे अशी अपेक्षा असते. त्यामुळे बरेचदा नात्यात तणाव येण्याची शक्यता असते. पैशांचे वाद हे नात्यात तडा आणण्यासाठी पुरेसे असतात. ज्या कुटुंबाशी तुम्ही संबंध जोडायचे म्हणत आहात किंवा विचारात आहात अशा कुटुंबाचे विचार जाणून घ्या. लग्नासंदर्भात त्यांचे विचार काय आहेत ते जाणून घ्या. म्हणजे तुम्हाला त्या कुटुंबाबद्दलची योग्य माहिती मिळू शकेल.कधी कधी या गोष्टीच कुटुंब आणि माणसं जाणून घेण्यासाठी महत्वाच्या असतात. त्यामुळे तुम्हाला आलेल्या स्थळातून परफेक्ट स्थळ निवडताना तुम्ही या गोष्टी करायला हव्यात.

खास व्यक्तीचा बर्थ डे...

वाढदिवस महत्त्वाचा आहे कारण या दिवशी प्रत्येकाला आपण खास असल्याची जाणीव हा दिवस देतो. त्यांच्यावर जवळच्यांचे आणि इतरांचेही किती प्रेम आहे ते हा दिवस दाखवून देतो. वाढदिवसामुळे एखाद्याला पुन्हा एकदा नवचैतन्याने जगण्याचं बळ मिळू शकतं...

वाढदिवस लक्षात कसा ठेवावा ?

अनेकदा आपल्याला एखाद्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा संदेश द्यायच्या असतात. जसं बहीण-भावाला, पत्नीकडून पतीला किंवा पतीकडून पत्नीला, आई-वडिलांना, लाडक्या मुला- मुलीला, मित्र-मैत्रिणीला वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायच्या असतात. पण प्रत्येकाचा वाढदिवस लक्षात ठेवणे सोपे नाही. आता सोशल मीडियामुळे आपल्याला एखाद्याच्या वाढदिवसाचं नोटिफिकेशन येतं. पण काही जण सोशल मीडियावर नसतात. तेव्हा मात्र त्यांचा वाढदिवस लक्षात ठेवण्यात पंचाईत होते. तसंच काहींचा वाढदिवस हा फेसबुक नोटिफिकेशनपेक्षाही आपल्यासाठी जास्त महत्त्वाचा असतो. त्यामुळे आपल्याला त्यांच्या खास दिवसाची आधीच तयारी करायची असते. हा वेळ आपल्याला फेसबुक देत नाही.

काय कराल... ?

तुमच्या फोनमधील किंवा शक्य असल्यास घरातील कॅलेंडरवर तुमच्या जवळच्यांचा आणि मित्रपरिवाराच्या वाढदिवसाचे दिवस नोंद करून ठेवा. यामुळे तुम्हाला एकाच ठिकाणी सगळ्यांचे वाढदिवस पाहता येतील. जर तुम्ही डायरी लिहीत असाल तर त्यात वाढदिवसाच्या नोंदी करून ठेवा. आजकाल डिजीटल कॅलेंडर्सही मिळतात. ज्यामुळे तुमचं काम नक्कीच सोपं होईल. यामुळे तुम्हाला वाढदिवस यायच्या आधीच कळेल आणि वाढदिवसाचं प्लॅनिंगही करायला वेळ मिळेल.

वाढदिवसासाठी नोटबुक किंवा डायरी

साध्या कॅलेंडरवर कुठे प्रत्येक महिन्याला वाढदिवस लिहीत बसणार नाही का ? त्यापेक्षा तुमच्या रोजच्या डायरीत किंवा नोटबुकमध्ये नोंद करून ठेवा तुमच्या आवडत्या व्यक्तींच्या वाढदिवसाची. कारण रोज उठल्यावर किंवा कामाला सुरुवात करण्याआधी बरेच जणांना डायरी पाहायची सवय असतेच तर काहींना रात्री झोपण्याआधी डायरी लिहायची सवय असते. आपल्या प्रत्येकाकडे आजकाल स्मार्टफोन असतोच. ज्याच्या कॅलेंडरमध्ये बरेचदा तुमच्या गुगल कॉन्टॅक्टप्रमाणे माहिती नोंदविली जाते. हे डिजीटल कॅलेंडर तुम्ही अपडेट ठेवल्यास तुम्हाला आपोआप मीटींग किंवा इव्हेंट रिमाइंडरसोबत बर्थडे रिमाइंडर्सही येतील.

खास डिजीटल ॲप

आजकाल डिजीटल ॲपचा जमाना आहे. प्रत्येक गोष्टीसाठी आता ॲप उपलब्ध आहे. मग वाढदिवसासाठी नाही असं कसं होईल. वाढदिवस लक्षात ठेवण्यासाठीही ॲप स्टोरवर अनेक ॲप उपलब्ध आहे. तुमच्या आवडीनुसार ॲप निवडा.

वाढदिवसाला शुभेच्छा देणं का आहे महत्त्वाचं...

तुमच्या एका वाढदिवस शुभेच्छेने जर तुमचं नातं दृढ होणार असेल तर का नाही ? मग ते प्रोफेशनली असो वा पर्सनली असो. जेव्हा एखाद्या बँकेकडून किंवा बिझनेसकडून कस्टमरचा वाढदिवस लक्षात ठेवला जातो. तेव्हा कस्टमरला नक्की छान आणि कौतुकास्पद वाटतं. जेव्हा आपला एखादा मित्र आपल्याला सरप्राईज किंवा स्पेशल गिफ्ट पाठवतो. तेव्हा आपल्याला आपली काळजी घेणारं कोणीतरी आहे असं नक्कीच वाटतं. जेव्हा एखादा बॉस आपल्या कर्मचाऱ्याला हॅपी बर्थडे विश करतो, तेव्हा कर्मचाऱ्यालाही त्याच्या कामाची किंवा त्या कंपनीत असल्याची पोचपावती खऱ्या अर्थाने मिळत असते.

लग्नानंतरची दोन वर्षे अधिक काळजीची!

संसार हा संघर्ष व समस्यांनी भरलेला असतो. काही जोडपी लग्नानंतर काहीच काळात वादाची शिकार होतात तर काही जोडपी नातं घट्ट ठेवण्यासाठी शक्य तितके प्रयत्न करताना दिसून येतात. आता ती गोष्ट वेगळी आहे की, लग्नानंतर नातं घट्ट व मजबूत बनवण्यासाठी अनेक प्रयत्न करून देखील काही लोकांचं नातं खिळखिळं होत जातं. पण लग्नानंतर सुरुवातीचे दोन वर्षे अत्यंत महत्त्वाची असतात. या सुरुवातीच्या काळात काही जोडपी एकमेकांना समजून घेण्यासाठी व खुश राहण्यासाठी एकमेकांच्या जास्तीत जास्त सहवासात राहतात तर काही जोडपी जबाबदाऱ्या व कर्तव्याच्या ओझ्याखाली दबून गेल्यासारखी राहू लागतात. यामुळे दोघांमध्ये नकारात्मक विचार जन्मास येऊ लागतात. म्हणूनच आज आम्ही सुरुवातीच्या दोन वर्षांचा काळ कसा सांभाळावा यासाठी काही खास टिप्स देणार आहोत...

■ प्रेमाने वागा : लग्नानंतर पहिले दोन वर्षे प्रत्येक जोडपं नातं घट्ट करण्यासाठी प्रयत्नशील असतं यात काहीच शंका नाही. या काळात पती-पत्नी एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करतात शिवाय एकमेकांच्या माहित नसलेल्या सवयी देखील त्यांना कळतात. प्रेमविवाह केलेल्या जोडप्यांना एकमेकांमधील चांगल्या-वाईट सवयी माहित असतात तर अरेंज्ड मॅरेजमध्ये याच्या एकदम उलट असते. अशावेळी आपल्या जोडीदाराची एखादी सवय खटकू लागल्यास त्यावरून वाद घालत बसण्यापेक्षा प्रेमाने संवाद साधा व समस्या सोडवा.

■ नात्याची सुरुवात करा सकारात्मक : नातं कोणतंही असो, ते सकारात्मक विचारांनी सुरू करण्याचा सल्ला दिला जातो. असं यामुळे की, लग्नानंतर अनेक लोक स्वतःला जबाबदाऱ्या व कर्तव्यात बांधलं असल्याचं फिल करतात आणि या कारणामुळे त्यांना आपल्या जोडीदाराप्रती नकारात्मक भावना व भंग झाल्याच्या भावना मनात येऊ लागतात. पण ही चूक न करता प्रत्येक जोडप्याने आपलं सांसारिक जीवन एखाद्या मजेदार राईडसारखं जगलं पाहिजे. कारण यात एकमेकांसोबत आनंदाने जीवन जगण्याचा व एकत्र काही नवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळते.



■ रोमांस जिवंत ठेवा... : लग्न काळातील मजा व हनीमून संपल्यानंतर काही जोडप्यांना पुन्हा एकदा पहिल्यासारखं जीवन रटाळ वाटू लागतं. काही जोडपी हे विसरूनच जातात की सांसारिक जबाबदाऱ्या व कर्तव्य पार पाडण्यासोबतच रोमांस जिवंत ठेवणंही गरजेचं असतं व हे शक्यही होऊ शकतं. नातं फ्रेश ठेवण्यासाठी हनीमूनसारख्या छोट्या मोठ्या ट्रिप्स काढणं गरजेचं असतं. या ट्रिप्स मध्ये एकमेकांना वेळ देण्याची संधी मिळते. शिवाय रोजच्या जीवनात काहीतरी नाविन्यपूर्ण गोष्टी अनुभवता येतात.

■ संवाद कायम राखा : लग्नानंतरच्या सुरुवातीच्या काळात अनेक जोडपी विविध कारणांमुळे एकमेकांशी संवाद साधणं टाळतात. जे की त्यांच्या संसारात गैरसमजांना निमंत्रण देऊ शकतं. संवाद आटल्यास पुढे जाऊन नातं खिळखिळं होऊ शकतं हे अनेक जोडपी विसरूनच जातात. त्यामुळे या काळात दूर पळण्यापेक्षा, वाद घालण्यापेक्षा, संवाद टाळून रुसून बसण्यापेक्षा एकमेकांना समजून घेण्याचा प्रत्येक जोडप्याने प्रयत्न करावा. संवाद ही सुखी नात्याची पहिली पायरी असते जी पार करणं सोपं नसतं.

■ एकमेकांना वेळ द्या : लग्नानंतरचा सुरुवातीचा काळ असा असतो ज्यामध्ये तुम्ही नातं घट्ट करण्यासोबतच एकमेकांच्या मनात आपला आदर रुजवू शकता. बहुतांश जोडपी लग्न झाल्या झाल्या ऑफिसच्या कामाच स्वतःला जुंपून टाकतात याचा प्रभाव नव्याने सुरू झालेल्या सांसारिक आयुष्यावर पडू शकतो. यामुळे एकमेकांना जाणून घेण्याची संधीच मिळत नाही व यामध्ये एकमेकांविषयी चुकीचे समज बनवून पार्टनर तसं वागू लागण्याची शक्यता अधिक असते. शिवाय आपल्यासाठी जोडीदाराला वेळच नाही ही भावना मनात असुरक्षितता व नकारात्मक भावनांना खतपाणी घालू शकते. म्हणून लग्नाच्या सुरुवातीलाच नाही तर आयुष्यभर आपल्या जोडीदाराला भरपूर वेळ द्या व नातं सजीव ठेवण्याचा प्रयत्न करा.

खासगी आयुष्याचं शेअरिंग करताना....

सोशल मीडियाचं वाढतं क्रेज पाहता प्रत्येक जण आपल्या आयुष्यातील सामान्य ते खास क्षण तिथे हमखास शेअर करताना दिसतात. लग्न ठरल्यापासून हनिमूनपर्यंतच्या प्रवासात साजरे केलेले सारेच आनंदाचे क्षण नवविवाहीत जोडपी आपल्या कुटुंबीय व मित्रमंडळींसोबत सोशल मीडियावर शेअर करतात. जिथे सामान्य लोक फोटो टाकण्यात उशीर करत नाहीत तिथे सेलिब्रेटीचं काय घेऊन बसलायत ? आवडत्या कलाकारांच्या फोटोंना चाहत्यांकडून लाखोमध्ये लाईक्स व कमेंट्स असतात. शिवाय ॲक्टिव राहण्यासाठी व आपल्या आयुष्याशी चाहत्यांनी जोडलेलं राहावं म्हणून कलाकारही आपले फोटो व विचार रोज सोशल मीडियावर शेअर करत असतात. हनीमूनचे फोटो सोशल मीडियावर अपलोड करणे खरंच योग्य आहे का ? म्हणजे असे खासगी आयुष्याशी निगडीत फोटो कुठेही अपलोड करताना काही बेसिक गोष्टींची खबरदारी बाळगणं गरजेचं असतं, यापासून हल्लीची पिढी अनभिज्ञ आहे का ?

इन्टिमेट फोटो टाकू नका...

भलेही आपला समाज आता पुढारतोय, मॉर्डन विचार स्विकारतोय पण तरीही किंसीग किंवा बेडरुममधील खासगी फोटो सोशल मीडियावर शेअर केल्याने तुम्ही लोकांच्या नजरेत येऊ शकता व नकारात्मक कमेंट्सचा तुम्हाला सामना करावा लागू शकतो. याबाबतील कलाकरांकडून अजिबात प्रोत्साहित होऊ नका, कारण त्यांच्या व तुमच्या फ्रेंड सर्कल-कुटुंबीयांमध्ये खूप अंतर असतं. सामान्य लोकांना काही मर्यादांचं पालन हे करावंच लागतं. तसंही इन्टिमेंट व रोमॅंटिक क्षण हे नवरा- बायकोमधील खासगी गोष्ट असून ती खासगीचं ठेवणं शहाण्याचं लक्षण असतं.

जोडीदाराचाही विचार करा

तुम्हाला भलेही हनीमूनचे फोटो शेअर करण्यात काहीही चूक किंवा लाज वाटत नसेल पण कदाचित जोडीदार या गोष्टीबाबत कम्फर्टेबल नसू शकतो. अशावेळी त्याच्याही भावनांचा आदर करा. फोटो शेअर करण्यास तो अथवा ती तयार झाले तरीही सिलेक्ट केलेले फोटो एकदा त्याला जरुर दाखवा व त्याने सांगितल्यास एखादा फोटो काढूनही टाका. भलेही ही साधारण गोष्ट असेल पण एकमेकांच्या मनाचा व भावनांचा विचार केल्यास नातं अधिक दृढ होईल व जोडीदाराच्या मनातील तुमच्याबद्दलचा आदर आणखीनच वाढेल.

शेअरिंग लिस्ट करा फिल्टर

आजकाल सोशल मीडियाद्वारे लोक कुटुंबीय, मित्रमंडळी, सहकारी, बॉस, नातेवाईक, शेजारी सर्वांशी जोडलेले असतात. अशावेळी तुम्ही शेअर केलेली प्रत्येक गोष्ट या लोकांच्याही नजरेस पडते. म्हणून फोटोंसाठी फिल्टर वापरणं गरजेचं आहे. खास करून हनीमून फोटो शेअर करताना अशा लोकांना नक्की हाईड करा जे याला चर्चेचा विषय व हसू बनवू शकतात. प्रत्येक व्यक्तीलाच आपल्या खास क्षणांचं कौतुक वाटेल, आनंद होईल असं मुळीच नाही. त्यामुळे आपल्या जीवलगांसोबत फोटो शेअर करताना फिल्टरचा वापर जरूर करा.

लोकेशन शेअर करू नका

तुम्ही भले इंडियात फिरा किंवा बाहेरच्या देशात, पण एक्जेट लोकेशन शेअर करणं टाळा. सुरक्षितता लक्षात घेता असं करणं अत्यंत आवश्यक आहे. हनीमूनवरून परत घरी आल्यानंतर जर तुम्ही फोटोसहित लोकेशन शेअर करताय तर काही चिंता नाही पण फिरत असतानाच लोकेशन ॲड करणं समस्येला निमंत्रण देऊ शकतं. त्यामुळे तुम्ही एखाद्या ५ स्टार हॉटेलमध्ये राहा किंवा मग रिसॉर्टमध्ये, पण लोकेशन मात्र गुपितच ठेवा.

सोशल मीडियापासून राहा लांब

सोशल मीडिया हल्ली एखाद्या व्यसनाप्रमाणे पसरतं आहे. म्हणजे एखादा व्यक्ती सोशल मीडियावर नसणं हे गावठीपणाचं लक्षणं मानलं जातं, अर्थात लोक असं हिनवतात. त्यामुळे अंदाजे ९९% लोकं ही आजच्या काळात हमखास सोशल मीडियाचा वापर करतात. इतर वेळी मन रमवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करणं वेगळं व आपल्या खास क्षणातही सोशल मीडियाला प्राधान्य देऊन आयुष्याचा हिस्सा बनवणं वेगळं. असं केल्याने तुम्ही हनीमून असो किंवा मग इतर कोणता क्षण, योग्य रितीने एन्जॉय करुच शकत नाही. २४ तास फोटो अपलोड करण्यास व्यस्त असल्यामुळे जोडीदारही कंटाळू शकतो. त्यामुळे आपल्या गोड क्षणांचा जास्तीत जास्त आनंद लुटा. स्वतःसाठी फिरा.

शॉर्ट न्यूज

जायकवाडीकडे २१ हजार क्युसेकने पाणी

प्रवरानगर : भंडारदरा व निळवंडे पाणलोटात गेल्या दोन दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू असल्याने भंडारदरा आणि निळवंडे धरणातून प्रवरा नदी पात्रात रविवारी सोडण्यात आले पाणी नेवासा येथील मध्यमेश्वर बंधाऱ्यात २४ तासांनी दाखल झाले आहे. प्रवरा नदी दुथडी भरून वाहू लागली आहेत. मध्यमेश्वर बंधाऱ्यातून जायकवाडीकडे २१ हजार क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. श्रावण महिन्यातील पहिल्या दिवसापासून प्रवरा नदीला पाणी आल्याने श्री मध्यमेश्वर महादेव मंदिरात पहाटे ओल्या वस्त्राने स्नान करून जल अभिषेक करणाऱ्या भाविकांमध्ये आनंद दिसून आला.

कोपरगावच्या पुरवठा निरीक्षकाला दमदाटी

कोपरगाव : पुरवठा विभागात पुरवठा निरीक्षक म्हणून काम करणाऱ्या अधिकाऱ्याला मी आणलेली कामे तुम्ही का करत नाही असा सवाल करुन तू येथे नोकरीं कशी करतो तेच बघतो अशी धमकी देऊन सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी एका विरुद्ध कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल साहेबराव आव्हाड असे आरोपीचे नाव असून पुरवठा निरीक्षक चंद्रकांत नानासाहेब चांडे यांनी शासकीय कामकाजात अडथळा आणल्या प्रकरणी कोपरगाव शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

रस्त्यामुळे गावाचा सर्वांगीण विकास

शेवगाव : शेवगावसह तालुक्याच्या ग्रामीण परिसरातील रहदारीच्या रस्त्यांच्या कामाला सुरुवात झाली आहे. कामे दर्जेदार पद्धतीने झाली पाहिजे, यासाठी त्या त्या परिसरातील नागरिकांनी सुद्धा जागरूक राहणे आवश्यक आहे. रहदारीच्या रस्त्यामुळे गावचा सर्वांगीण विकास होत असतो. विकासाची ही गंगा या पुढील काळातही अधिक वेगाने वाहती राहण्यासाठी आपण आपली शक्ती माझ्यामागे उभी करणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले.

फुलसौंदर मळ्यात जुगार अड्ड्यावर छापा

नगर : कामगार असल्याचे भासवून पिकअपमधून गेलेल्या कोतवाली पोलिसांनी फुलसौंदर मळ्यातील जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या छाप्यादरम्यान नऊ जुगारी पकडले असून त्यांच्याकडून रोकड, दुचाकी व चारचाकी वाहने, जुगाराचे साहित्य असा एकुण १८ लाख ४२ हजार ६५० रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. भुषण बोरूडे, प्रशांत गिरीष कसबे, अनिल साबळे, राजेंद्र पांडुरंग शिंदे, किरण पांडुरंग सिदोरे, विशाल गांधी, भाऊसाहेब रामभाऊ भोसले, शळेख सलमान बशिर व राधाकिसन पांडुरंग फुंदे अशी पकडलेल्या जुगाऱ्यांची नावे आहेत.

महिमा नागेबाबांचा पुस्तकाचे प्रकाशन

भेंडा : गावचे जागृत ग्रामदैवत श्रीसंत नागेबाबा यांचे सचित्र जीवन पट असेलेल्या महिमा नागेबाबांचा पुस्तकाचे प्रकाशन श्रीक्षेत्र देवगड संस्थानचे महंत भास्करगिरी महाराजांचे हस्ते झाले. यावेळी अशोकराव मिसाळ यांनी अर्पण केलेल्या सव्वातीन किलो वजनाच्या संत नागेबाबांच्या चांदीच्या मूर्तिची प्राणप्रतिष्ठापणा महंत भास्करगिरी महाराज यांचे हस्ते करण्यात आली. यावेळी समाधान महाराज शर्मा, दिनकर महाराज मते, अंकुश महाराज कादे, बाळू महाराज कानडे, नागेबाबा परिवाराचे अध्यक्ष कडूभाऊ काळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

घोडगंगा कारखान्याच्या अधोगतीस आमदार आणि कारखान्याचे संचालक मंडळ जबाबदार

कारखान्यातील कामगारांचा पत्रकार परिषदेत आरोप

शिरूर : प्रतिनिधी

तालुक्यातील रावसाहेबदादा पवार घोडगंगा सहकारी साखर कारखान्याच्या अधोगतीस आमदार अशोक पवार यांच्यासह कारखान्याचे संचालक मंडळ जबाबदार असल्याचा आरोप कारखान्यातील काही कामगारांनी आज येथे पत्रकार परीषदेत केला. कारखान्याला वेळोवेळी मदत करणारे आणि यशोशिखरावर नेण्यास कायमच सहाय्य करणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांना याबाबत दूषणे देणे चूकीचे असून, एक स्वयंघोषित कामगार नेता विनाकारण त्यांची बदनामी करीत आहेत. त्यांच्या पाठिशी कुणीही कामगार नसल्याचा दावा या कामगारांनी केला. अजितदादांनीच घोडगंगाच्या विषयात लक्ष घालून कारखान्याची परिस्थिती पूर्वपदावर आणावी, अशी आग्रही मागणीही करण्यात आली.

घोडगंगा कारखाना कामगार पतपेढीचे संचालक तात्यासाहेब शेलार, महेंद्र काशीद, संपत कोहकडे, नानासाहेब उकले, काळूराम होळकर, दिपक कुरंदळे, रवींद्र दरेकर, राजेंद्र घावटे, राजेंद्र नवगिरे, संतोष कोळपे, सिराज तांबोळी, जयदीप शितोळे, रवींद्र माने, लहानू रासकर आदी कामगार यावेळी उपस्थित होते. स्वतःला घोडगंगा कामगारांचा नेता म्हणविणाऱ्या महादेव मचाले यांनी कुठल्याही कामगाराला विश्वासात न घेता संचालक मंडळाला सामील होऊन त्यांच्या सूचनेप्रमाणे बोलून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टिकाटिपण्णी करून या विषयाला वेगळे वळण दिल्याचा आणि संचालक मंडळाकडून कामगारांत फूट पाडण्याचा प्रयत्न चालू असल्याचा आरोप काशीद यांनी केला. कामगारांच्या वतीने बोलत असल्याचा देखावा करणाऱ्या महादेव मचाले यांच्यासारख्या प्रवृत्तींचा समस्त कामगारांच्या वतीने निषेध नोंदवत असल्याचे ते म्हणाले.

घोडगंगा साखर कारखान्याचा कारभार २०१६ पासूनच डबघाईला आल्याची वस्तूस्थिती असून, कामगारांचे तब्बल वीस पगार थकलेत. महायुतीच्या सरकारमध्ये अजितदादा तर गेल्यावर्षी सहभागी झाले. त्याआधी पासून कारखान्यावर कर्ज आहे. मग ते या सर्व स्थितीला जबाबदार कसे, असा सवाल शेलार यांनी केला. अजित पवारांमुळे कारखान्याला कर्ज मिळत नसल्याचा विद्यमान संचालक मंडळाचा दावा खोटा आणि स्वतःच्या चुका झाकणारा आहे, असेही ते म्हणाले. मागील गळीत हंगामात साडेचार लाख टन उसाचे गाळप झाले. त्या कामाचे दाम कारखान्याने द्यावे, अशी आग्रही मागणी कामगारांनी केली.

घोडगंगा कारखान्यातील मृत कामगारांच्या कुटूंबियांना देण्यासाठी प्रत्येक कामगार आपला एक दिवसाचा पगार द्यायचा. त्यातून प्रत्येक कर्मचाऱ्याचे चार ते पाच लाख रूपये कापले गेले असून, ही ८९ लाख रूपयांची रक्कम मृत कामगारांच्या वारसांना मिळणे गरजेचे होते. सन २०१६ - १७ पासून १६ कर्मचारी मृत झाले असून, त्यांच्या कुटूंबियांना अद्याप हे पैसे न मिळाल्याने त्यांचे हाल चालू आहेत. मृत कामगारांच्या कुटूंबियांचे पैसे पण अजितदादांनीच अडविले का ?

असा सवाल कारखान्याच्या कामगारांच्या पतसंस्थेचे संचालक तात्यासाहेब शेलार यांनी उपस्थित केला.

खंडकरी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देता आल्याचे समाधान

महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रतिपादन

राहाता : प्रतिनिधी

यापुर्वी जिल्ह्याला महसूल मंत्रीपद मिळूनही खंडकरी शेतकऱ्यांना न्याय मिळू शकला नाही. शेतकऱ्यांना जमीनी मिळाव्यात ही भावनाच त्यांची नव्हती. महायुती सरकारमुळे जमीनी भोगवटा वर्ग एक करुन, विनामोबदला शेतकऱ्यांच्या नावावर करण्याचा ऐतिहासिक निर्णय होवू शकला. अनेक वर्षे चाललेल्या या संघर्षात शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी महसूल मंत्री म्हणून योगदान देता आल्याचे समाधान मोठे असल्याचे प्रतिपादन महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

महायुती सरकारमुळे राज्यातील खंडकरी शेतकऱ्यांच्या जमीनींबाबत महत्वपूर्ण निर्णय झाला. यासाठी महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांचा विशेष पुढाकार राहील्याने राहाता तालुक्यातील सुमारे २ हजार ३०५ शेतकऱ्यांच्या जमीनी नावावर करुन त्याचे ७/१२ उतारे सुपूर्त करण्यात आले. १४ गावांमधील खंडकरी शेतकऱ्यांच्या जमीनी त्यांच्या नावावर झाल्या असून, ५० टक्के नजराना कमी झाल्याने या शेतकऱ्यांना कोट्यावधी रुपयांचा लाभ झाला आहे. तसेच सार्वजनिक हितासाठी शेती महामंडळाच्या जमीनीही देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला.

या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमास आ.आशुतोष काळे, प्रांताधिकारी माणिकराव आहेर, तहसिलदार अमोल मोरे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुधाकर बोराळे, शेती महामंडळाचे प्रदिपकुमार पवार यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

रुई येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले. माझ्या राजकीय आयुष्यातील सर्वात ऐतिहासिक दिवस आजचा आहे. खंडकरी शेतकऱ्यांच्या जीवनातील नवा अध्याय आजपासून सुरु होणार आहे. या जमीनींसाठी वर्षानुवर्षे संघर्ष झाला. लोकनेते पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील, स्व.माधवराव गायकवाड, स्व.सुर्यभान वहाडणे, प्रा. ना.स फरांदे यांचा नामोल्लेख करुन, या सर्वांच्या मेहनतीमुळे या संघर्षाला न्याय मिळू शकला. मात्र यापुर्वी सत्तेवर आलेल्या लोकांना खंडकरी शेतकऱ्यांच्या भावना समजल्या नाहीत. त्यामुळेच या जमीनी शेतकऱ्यांच्या नावावर होवू शकल्या नाहीत.

राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर या प्रश्नाचा आपण व्यक्तिश: पाठपुरावा केला. शेतकऱ्यांची बाजु भक्कमपणे मांडली. त्यामुळेच मंत्रीमंडळात या जमीनी भोगवटा वर्ग दोन मधून एक करण्याचा निर्णय होवू शकला. मात्र शेतकऱ्यांवर कोणताही आर्थिक भार येवू नये ही भुमिका आपण कायम ठेवल्यामुळेच विनामोबदला या जमीनी शेतकऱ्यांच्या नावावर होवू शकल्या. या जमीनी शेतकऱ्यांना मिळूच नये हीच भूमिका जिल्ह्यातील काही नेत्यांची होती. यासाठी संघर्ष करणाऱ्या शेतकऱ्यांचे त्यांना कोणतेही देणेघेणे नव्हते अशी टिका मंत्री विखे पाटील यांनी केली. राज्यातील महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठीच काम करीत असून, आता वीजबिल माफीचा निर्णय सरकारने घेतला असून, एक रुपयात पीकविमा योजनेमुळे जिल्ह्याला ११६५ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजुर झाली आहे. राहाता तालुक्यातील शेतकऱ्यांना १२१ कोटी रुपये मंजुर झाले असल्याची माहीतीही ना.विखे पाटील यांनी आपल्या भाषणात दिली.

(पान १ वरून)

आमदार अपात्रतेची सुनावणी १ आठवड्यांनी पुढे ढकलली

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठापुढे सुनावणी पार पडली.

शिवसेनेनं दाखल केलेली कागजपत्रं पूर्ण असून अजित पवारांच्या राष्ट्रवादीनं कागदपत्रं सादर करण्यासाठी वकिलांच्या माध्यमातून अतिरिक्त वेळ मागितला आहे. अजित पवारांच्या वकिलांनी केलेली मागणी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठानं मान्य केली आणि या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात आली. विधानसभेचा कार्यकाळ संपत आलेला आहे. निवडणुकीला अवघ्या दोन महिन्यांचा कालावधी राहिलेला असताना न्यायालयाच्या तारखा पडत आहेत. या प्रकरणाचा निकाल कधी लागणार, असा प्रश्न सामान्यांना पडला आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
प्रसूती विभाग
प्रसूती पूर्व तपासणी
संपूर्ण प्रसूती उपचार
अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
गर्भपिशवीचे आजार
अंगावरुन पांढरे किंवा लाल जाणे
गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
Infertility वंधत्व उपचार
वारंवार होणारे गर्भपात,
लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
स्तनांचे आजार आणि उपचार
PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

वाचकांच्या लेखणीतून

माझे शुध्दलेखन

१९८४ साली मुंबईच्या एसएनडीटी महाविद्यालयात पत्रकारितेच्या वर्गाला जात होतो. तेव्हाची आठवण आहे.

पत्रकारितेचा अभ्यासक्रम संपत आल्याचा काळ होता. आमचे पत्रकारिता अभ्यासक्रमाचे राम कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब बाक्रे हे समन्वयक होते. ते त्या काळचे नामांकित पत्रकार होते. समाजवादी पक्षाचे थोर नेते एस.एम. जोशींचे ते मित्र. मी एस.एम. या आत्मचरित्राचे शब्दांकन बाक्रे यांनीच केले आहे. पत्रकारिता क्षेत्रात आणि मित्रमंडळींमध्ये बाक्रे यांना तात्या म्हणूनच संबोधले जाई. आम्हीही त्यांना तात्याच म्हणत असू. उषा मेहता यांच्या आभास नामक काव्यसंग्रहाचे परीक्षण करून आण, असे तात्यांनी मला सांगितले.

त्यांनी तो काव्यसंग्रह माझ्या हातात दिला. शब्दमर्यादा सांगितली. दुसऱ्या दिवशी मी तो काव्यसंग्रह वाचला. दोनतीन दिवसांनी त्या काव्यसंग्रहाचे परीक्षण लिहून आणले. ते तात्यांजवळ दिले. माझे हस्तलिखित चाळून ते म्हणाले, मस्त टाके घातले आहेस! तात्पर्य मी काव्यपरीक्षणाची मांडणी छान केली आहे. सुसूत्रपणे केली आहे. ते पुढे म्हणाले, मी हे हस्तलिखित मेहताबाईंना दाखवितो. नंतर तुला सांगतो.

साधारण आठवड्याभराने तात्या मला म्हणाले, तुझं काव्य परीक्षण मी मेहता बाईंना दाखवलं. हे ढवळे जुन्या वळणाचे दिसतात, असं त्या म्हणाल्या. बाईंच्या मुक्तछंदात्मक कविता मला आवडल्या नव्हत्या. मुक्तछंदावर मी खरमरीत टीकाही केली होती. माझे मत सर्व वाचकांना आवडेलच असे नाही. म्हणून हा काव्यसंग्रह प्रत्येक काव्य रसिकाने जरूर वाचून पहावा, अशी शिफारसही मी लेखाच्या अंती केली होती.

माझ्यासारखेच पंडित भीमसेन जोशी यांचे चरित्र तात्यांनी माझ्या एका सहाध्यायाला परीक्षणासाठी दिले होते. त्यानेही आपले पुस्तकपरीक्षण तात्यांना दाखविले. ते चाळून तात्या त्याला टोमणा मारीत म्हणाले, शुध्दलेखन कसं करावं ते या ढवळेकडून शीक! होय. अशुध्दलेखन हे पत्रकार, लेखक वा कवींसाठी अभिमानाची गोष्ट नाही! अर्थात माझे शुध्दलेखन बरे आहे, याचा मला अभिमानच वाटला! आजही वाटतो!

इतरही विद्यार्थ्यांना काही लेखन सांगितले होते. तेही तात्यांनी जमा करून घेतले होते. अर्थात तो कम्प्युटर वा झेरॉक्सचा जमाना नसल्याने सायक्लोस्टाईल पध्दतीने आम्हा विद्यार्थ्यांच्या साहित्याचे काही अंक तात्यांनी तयार करून आणले आणि प्रत्येक विद्यार्थ्याला एकेक अंक वाटला. सदर अंकात माझाही लेख प्रकाशित झाला होता. त्यामुळे मला विशेष आनंद वाटला!

नाना ढवळे
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

आदित्य ठाकरेंना वरळीत घेरण्याची तयारी राज ठाकरे पुतण्याला टार्गेट करणार ?

मुंबई: प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा देणारे मनसेप्रमुख राज ठाकरे विधानसभेच्या तयारीला लागले आहेत. विधानसभा निवडणूक स्वबळावर लढण्याची घोषणा त्यांनी केली आहे. राज ठाकरेंनी लोकसभा निवडणुकीवेळी घेतलेली भूमिका पाहता ते विधानसभेला महायुतीत जातील अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र त्यांनी एकला चलो रेची भूमिका घेतली आहे. वरळीत पुतण्या आदित्य ठाकरेंना आव्हान देण्याची तयारी राज यांनी सुरु केली आहे.

२०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत आदित्य ठाकरे वरळीतून लढले आणि ६७ हजार ४२७ मतांनी विजयी झाले. निवडणूक लढवणारे ते ठाकरे कुटुंबातील पहिलेच होते. पण लोकसभा निवडणुकीत आदित्य यांच्या मतदारसंघातून ठाकरेसेनेचे उमेदवार अरविंद सावंत यांना केवळ ६ हजार ७१५ मतांची आघाडी मिळाली. लोकसभेत ठाकरेसेनेचे वरळीत घटलेलं मताधिक्य पाहून मनसेने आदित्य यांच्याविरोधात तगडा उमेदवार देण्याची तयारी सुरु केली आहे. माजी नगरसेवक संदिप देशपांडे यांना मनसेकडून तिकीट दिले जाऊ शकते. ते गेल्या काही दिवसांपासून वरळीत सक्रिय झाले आहेत.

एकीकडे संदिप देशपांडे सक्रिय झालेले असताना मनसे प्रमुख राज ठाकरेंनी पोलीस कॉलनी, बीडीडी चाळीत राहणाऱ्या रहिवाशांचे प्रश्न घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेतली. वरळीतील पुनर्विकासाचा प्रश्न मोठा आहे. अनेक योजना रखडलेल्या आहेत. त्याच पार्श्वभूमीवर राज यांनी शनिवारी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. ही भेट मनसेच्या निवडणूक तयारीचाच भाग मानला जात आहे.

राज ठाकरेंच्या भेटीनंतर मुख्यमंत्री कार्यालयाने अधिकाऱ्यांना वरळीशी संबंधित प्रश्न प्राधान्याने सोडवण्याचे आदेश दिले. वरळीतील रहिवाशांचे प्रश्न सोडवण्यासाठी मनसे नेते संदिप देशपांडे लोकांशी थेट संबंध ठेवून आहेत. २०१९ मध्ये मनसेने विधानसभा निवडणुकीत वरळीत उमेदवार दिलेला नव्हता. उद्धव ठाकरेंचे पुत्र आदित्य निवडणूक लढवत असल्यानं, ठाकरे कुटुंबातील व्यक्ती प्रथमच निवडणुकीच्या रिंगणात असल्याने राज यांनी वरळीत उमेदवार दिला नव्हता. आदित्य ठाकरे ही निवडणूक ६२ हजार २४७ मतांनी जिंकले होते.

जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
नोंदणी क्र. महा. ३९६/२२
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
आमची वैशिष्ट्ये
१ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

कधीही हाक द्या, मी सदैव तुमच्यासोबत!

राणीताई लंके यांची नगरमधील महिलांना साद

नगर : प्रतिनिधी

महिलांना त्यांच्या व्यवसाय वृध्दीसाठी विविध संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. अशा संधी उपलब्ध करून देण्यासाठी तुम्ही मला कधीही हाक द्या, मी सदैव तुमच्यासोबत असेल अशी साद जिल्हा परिषदेच्या मा.सदस्या राणीताई लंके यांनी नगर शहरातील महिलांना घातली.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी आणि ए आर न्यूज चॅनलच्या संपादिका श्रुती बत्तीन-बोज्जा यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या श्रावण शॉपींग महोत्सवाचे उद्घाटन लंके यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना लंके म्हणाल्या, श्रुती बत्तीन यांनी श्रावण महोत्सवाचे आयोजन करून महिलांनासाठी संधी उपलब्ध करून दिली याचा आनंद आहे. असेच महोत्सव होत रहावेत. महिलांना त्यांच्या व्यवसाय वृध्दीसाठी विविध प्रकारच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्या उपलब्ध करून देण्यासाठी तुम्ही मला कधीही हाक द्या, मी सदैव तुमच्यासोबत असेल अशी ग्वाही देतानाच महिलांनी स्वावलंबी व्हावे, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी, त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी असे शॉपींग महोत्सव आयोजित करण्याची आवष्यकता असल्याचे लंके म्हणाल्या.

एका छताखाली अनेक उत्पादने उपलब्ध असणाऱ्या या महोत्सवात विविध प्रकारच्या राख्या, महालक्ष्मी सजावटीचे साहित्य, ड्रेस मटेरियल, ज्वेलरी गिफट आर्टीकल्स, मसाले, आयुर्वेदीक प्रॉडक्ट आदी शंभरहून अधिक स्टॉल या महोत्सवात लावण्यात आले आहेत. महोत्सवात खाद्यपदार्थांचा आस्वाद देण्याचीही सुविधा असून शनिवार व रविवारी पार पडलेल्या या महोत्सवात ग्राहकांनी मोठया संख्येने हजेरी लावली होती.

यावेळी छायाताई फिरोदीया, वैशाली कोलते, नीना मोरे, आशाताई फिरोदिया, ज्योती गांधी, लता भगत, शुभा भागवत, डॉ. प्रियंका गांधी, स्वाती गुंदेचा, मिनल बोरा आदी उपस्थित होत्या. विभा तांबडे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले.

चोंभूतला संत सावता माळी महाराज यांची पुण्यतिथी साजरी

भावगीते ,भक्तीगीते व सुगमसंगीताचा कार्यक्रम

चोंभूत : प्रतिनिधी

'कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी,लसुण मिरची कोथंबिरी अवघा झाला माझा हरि' असे अभंगातून म्हणणारे संत शिरोमणी सावता माळी यांची पुण्यतिथी सोहळा पारनेर तालुक्यातील चोंभूत येथे भक्तिमय वातावरणात संपन्न करून विनम्र अभिवादन करण्यात आले. संत सावता माळी हे शेतकामावर विशेष प्रेम करत असत. त्यांनी कामातच परमेश्वराला पाहिले होते.कामातच मला विठ्ठल दिसतो असे त्यांचे मत होते. संप्रदायिक च्या माध्यमातून त्यांनी विठ्ठलाची सेवा केली व समाजप्रबोधन केले. त्यांचे संप्रदायिक क्षेत्रात विशेष अनन्यसाधारण महत्व आहे.

चोंभूत गावातील श्री संत सावता महाराज वारकरी संप्रदाय व सावता परिषद आणि समस्त ग्रामस्थ यांच्या वतीने पुण्यतिथी सोहळा पार पाडला. यात सकाळ सत्रात संत सावता महाराज मूर्ती अभिषेक, महापूजा विधी तसेच स्वरांजली

कलामंच पुणे निर्मित ''गौरव मराठी ''या भावगीते व भक्तिमय सुगमसंगीत भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यान नंतर संत सावता महाराज यांच्या प्रतिमेची मिरवणूक भजन गाऊन पारंपरिक वाद्यात संपन्न झाली. सायंकाळी ह. भ. प. निशाताई गायकवाड यांचा प्रबोधनपर कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला यात कीर्तनकार निशाताई गायकवाड यांनी संत सावता महाराज यांच्या संप्रदायिक कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला व उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता उपस्थित ग्रामस्थ यांना भोजन देऊन करण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे आयोजन खंडू मेहेर सावता परिषद संपर्क प्रमुख पारनेर तालुका,नाना जमदाडे, नितीन घोलप, धनंजय मेहेर, शिवाजी कोल्हे,बाळू नाना मेहेर, दत्ता कोल्हे, रावसाहेब माळी, संतोष माळी, भाऊ माळी सर, आकाश पारखे, प्रकाश वाघुले,सतीश कोल्हे बबन कोल्हे, दत्ता जमदाडे, स्वप्नील पारखे, शंकर मेहेर, दत्ता मेहेर, रामदास पारखे,भाऊ मेहेर, भाऊ पारखे, दादाभाऊ माळी, सावता परिषद व समस्त ग्रामस्थ चोंभुत यांनी केले.दिवसभरातील संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. भाऊ सुदाम माळी सर यांनी केले. तर आभार खंडू मेहेर यांनी मानले.यावेळी संत सावता महाराज वारकरी संप्रदाय व सावता परिषद चे पदाधिकारी आणि समस्त ग्रामस्थ व महिला वर्ग उपस्थित होता.

आदर्श गाव हिवरेबाजारमध्ये निसर्गाच्या सानिध्यात योगसाधना

पद्मश्री पोपटराव पवारांचे मार्गदर्शन । महिलांची गावातून शिवारफेरी

सुपा : प्रतिनिधी

केडगाव मधील कर्मयोगी योगा स्टुडिओच्या महिलांनी आदर्श गाव हिवरेबाजार मध्ये रविवारी सकाळी आहार तज्ञ आणि योगशिक्षिका ज्योती येणारे यांच्या मार्गदर्शनाखाली निसर्गाच्या सानिध्यात योगाचे धडे गिरवले.

यावेळी महिलांना मार्गदर्शन करताना पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले की, संपूर्ण जगात भारतीय संस्कृतीवर आधारित असलेल्या योगाचा स्वीकार केला आहे. योगाने अनेक आजार विकार बरे होऊन आनंदी जीवनाचा लाभ घेता येतो. अनेक दुर्धन आजारावर योगद्वारे मात करता येते असे त्यांनी सांगितले. तसेच यावेळी महिलांसाठी प्राथमिक शिक्षिका शोभाताई पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली गावात शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी गावातील वृक्षारोपण व सेंद्रिय शेतीची माहिती दिली.

याप्रसंगी वसुधा दहातोंडे, दामिनी सातपुते, राधाबाई येणारे, नयना पाळेकर, संगीता गोरे, तृप्ती देवकर, चैताली बर्वे, कल्याणी ठोबे, शारदा रणसिंग, मंगल आंधळे, पुनम देशमुख, जयश्री मेढे, अर्चना गोडसे, सविता आंधळे, मीनाक्षी काटमोरे, शोभा धामणे, मेघा कावरे, सुवर्ण चोरडिया, आरती काळे, शितल जांगडा, लता सातपुते, कल्पना पातारे, मीना गवळी, कल्याणी ठुबे, प्रियंका सोनी, विजया पाटील आदी उपस्थित होत्या.

योगसाधनेला अनन्यसाधारण महत्त्व

दररोज एक तास तरी योग साधनेचा अभ्यास करावा आजच्या धकाधकीच्या जीवनात योगसाधनेला खूप महत्त्व आहे, त्याचबरोबर आहाराविषयी ज्योती येणारी यांनी मार्गदर्शन केले. आजच्या जीवनात आहार आणि योग साधना यांचा समांतर राखण खूप गरजेचे आहे, योगा करण्यासाठी वयाचे बंधन नसते त्याचबरोबर पौष्टिक आहार घेणे खूप गरजेचं आहे. कोणत्याही आजाराचे मूळ कारण म्हणजे आपली जीवनशैली याच्यावर अवलंबून असते आपला योग्य आहार आणि व्यायामाचे संतुलन जर व्यवस्थित ठेवले तर आपल्याला रोजच्या जीवनामध्ये डायबेटिस थायरॉईड पीसीओडी किंवा प्रतिकारशक्ती कमी असणे त्वचेचे आजार हे आपल्याला होणार नाही किंवा कमी प्रमाणात असतील असे आहार तज्ञ व योगशिक्षिका ज्योती येणारे यांचे मत आहे. याप्रसंगी त्या म्हटल्या की, आजार झाल्यानंतर आहार आणि व्यायाम करण्यापेक्षा इथून पुढे आजार होऊ नये म्हणून आपण अशा पद्धतीने आहार किंवा योग साधना करणे गरजेचे आहे जेणेकरून आपलं पुढचं आयुष्य सुरळीत,आनंदी आणि समाधानी जाईल.

जागतिक आदिवासी दिनानिमित्त मोटारसायकल रॅली

जामगावला विविध कार्यक्रमांचे आयोजन

जामगाव : प्रतिनिधी

एकलव्य युवा फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जागतिक आदिवासी दिनानिमित्त ९ऑगस्टला पारनेर तालुक्यात मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले असून यानंतर जामगाव येथे विविध कार्यक्रम संपन्न होणार असल्याची माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली.

जगातील सर्व देशांमध्ये आदिवासी समाजाचे लोक राहतात. त्यांची भाषा, संस्कृती, सण-उत्सव, चालीरीती, पेहराव या सर्व गोष्टी वेगळ्या आहेत. त्यामुळे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहाशी जोडता आलेले नाही. वेळोवेळी त्यांची संख्याही कमी होत असल्याचे अहवालात दिसून आले आहे. आदिवासींना आपले अस्तित्व, संस्कृती आणि सन्मान वाचवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. या जमातीचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी, त्यांची संस्कृती आणि आदर जतन करण्यासाठी ९ ऑगस्टला आदिवासी दिन साजरा केला जातो.

पारनेर येथून मोटार सायकल रॅलीस सुरुवात होणार असून काकणेवाडी ,टाकळी ढोकेश्वर ,कर्जुले हर्या, धोत्रे माळकूप, भाळवणी , लोणी हवेली या मार्गी ही यात्रा जाणार आहे.यात्रेची सांगता जामगाव येथे होणार आहे.यावेळी एकलव्य जयंती आदिवासी महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन तसेच भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. राज्यभरातून येणाऱ्या पारंपारिक वेशातील आदिवासी बांधव या मिरवणुकीत सहभागी होणार असून पारंपारिक वाद्य हे मिरवणुकीचे आकर्षण ठरणार आहे.यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आल्याचेही संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले.

निघोज,पठारवाडीच्या निसर्गरम्य शिवशंभो डोंगरावर वृक्षारोपण

ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद यांचा पुढाकार श्रावण महिन्यात भाविकांची दर्शनासाठी गर्दी

निघोज : प्रतिनिधी

निघोज व पठारवाडी परिसरातील शिवशंभो डोंगर म्हणजे एक निसर्गरम्य परिसर असून ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद व त्यांच्या सहकाऱ्यांनी या ठिकाणी गेली दोन वर्षांपासून वृक्षारोपण करीत या डोंगराची शोभा मोठ्या प्रमाणात वाढवण्याचे काम केले आहे.

निघोज आणि पठारवाडी या दोन्ही गावच्या सिमेवर असणारा हा शंभू महादेवाचा डोंगर पुर्वी संभूचा डोंगर म्हणून प्रसिद्ध होता. या ठिकाणी शेकडो वर्षांपासून शंभू महादेवाचे जागृत देवस्थान असून गेली दहा ते बारा वर्षांपासून प्रत्येक महाशिवरात्री दिनी पुजा अर्चा अखंड हरिनाम सप्ताह तसेच धार्मिक उत्सव मोठ्या उत्साहात या ठिकाणी साजरा होत आहे. तसेच श्रावण महिन्यात दररोज अभिषेक,पुजा अर्चा तसेच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते यामध्ये विशेष करुन पठारवाडी तसेच निघोज ग्रामस्थ तसेच काळे वस्तीवरील ग्रामस्थ, कवाद परिवार, खैराडी परिसर यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो.

याठिकाणी ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करीत त्यांनी आजपर्यंत शेकडो वृक्षांचे संगोपन केले आहे. हा परिसर अतिशय निसर्गरम्य आणि लक्षवेधी करण्याचे काम या परिसरातील ग्रामस्थांनी केले आहे. यामध्ये मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठलराव कवाद व त्यांच्या सहकाऱ्यांनी वेळोवेळी केलेले सहकार्य आणि केलेली मदत याकामी उपयोगात आली आहे. एक कार्यक्षम ग्रामपंचायत सदस्या म्हणून सुधामती कवाद यांचा नावलौकिक असून लोकसभा निवडणुकीत खासदार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ केलेले त्यांचे योगदान सर्वाधिक आहे. शंभू महादेव डोंगर परिसरात

मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण आणि परिसर विकासाची कामे सुरू असून यासाठी शिवशंभो मंडळ आणि तसेच सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या प्रमाणात योगदान देण्याचे काम करीत असतात.

यासाठी बाबाजी काळे,संतोष काळे, रोहिदास काळे, दत्ता काळे, शंकर काळे,विकास काळे, स्वप्निल काळे,कैलास काळे, दादाभाऊ काळे, दादा कवाद, शशिकांत कवाद, यशोदीप लंके, लहू काळे, विश्वजीत काळे, रवी काळे, गुलाब काळे, बाल्या काळे,संदीप काळे, बापू काळे, माऊली काळे, स्वप्निल काळे, सोन्या काळे,पप्पू काळे, विक्रम काळे, हिरामण कवाद,कैलास काळे, अनिल कवाद, केशव कवाद, दिनेश कवाद, रामदास कवाद, किसन कवाद, पोपट कवाद, गणेश काळे, विशाल कवाद, दत्ता कवाद, दादा काळे, शुभम कवाद तसेच पठारवाडी व निघोज ग्रामस्थ, शिवशंभो मंडळ आदी कार्यरत असल्याची माहिती मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठलराव कवाद यांनी दिली आहे.

निघोज जिल्हा परिषद शाळेत मैत्री दिन साजरा

मैत्रीतील दृढता वाढण्यासाठी उपक्रम

निघोज : प्रतिनिधी

निघोज जिल्हा परिषद शाळेत मैत्री दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक कैलास शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी ते म्हणाले मैत्री फार महत्त्वाची असून यामुळे स्नेहभाव वाढीस लागतो. फ्रेंडशिप डे म्हणून हा दिवस असून याला मैत्री दिन म्हणून संबोधले जात आहे. जेवढे रक्ताचे नाते महत्वपूर्ण असून तेवढीच मैत्रीतील दृढता महत्वाची आहे. यासाठी जिल्हा परिषद शाळेत मैत्री दिनाच्या माध्यमातून हे मैत्री नाते भक्कम होण्यासाठी प्रयत्न केले आहेत.यावेळी ज्येष्ठ शिक्षक सुभाष महाराज मगर, काळे सर, काळोखे सर, शिक्षीका दिघे मॅडम, सालके मॅडम आदी उपस्थित होते.

राळेगणसिद्धीच्या तरुणाचा अपघाती मृत्यू

■ कंटेनर व स्विफ्ट कार यांची समोरासमोर धडक
■ शिरुरजवळील नागरगाव येथील घटना

शिरुर : प्रतिनिधी

नागरगाव (ता. शिरूर) येथील न्हावरे-केडगाव चौफुला रस्त्यावर कंटेनर व मोटारीची समोरासमोर टक्कर झाली. यामुळे झालेल्या अपघातात राळेगण सिध्दी येथील तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना सोमवारी (ता.५) सकाळी सहाच्या सुमारास घडली. या घटनेने राळेगण परिसरावर शोककळा पसरली आहे.

या अपघातात मनोजकुमार सोन्याबापू औटी (वय ३२, रा. राळेगण सिध्दी, ता. पारनेर जि. अहमदनगर) असे मृत्यू झालेल्याचे नाव आहे. सागर रावसाहेब भुजबळ (रा. भुजबळ वस्ती नाशिक रोड पोहेगाव, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर) हा तरुण अपघातात जखमी झाला आहे. याबाबत लाभेश गणपतराव औटी (रा. राळेगण सिद्धी, ता. पारनेर, जि. अहमदनगर) यांनी मांडवगण फराटा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सोमवारी (ता.५) सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास नागरगाव फाटा येथील अन्नपूर्णा हॉटेलसमोर हा अपघात झाला. नगर जिल्ह्याच्या पारनेर तालुक्यातील राळेगण सिद्धी येथील मनोजकुमार औटी हे सागर भुजबळ या मित्रासोबत बारामती येथे जात होते. नागरगाव येथील अन्नपूर्णा हॉटेलसमोर त्यांची भरधाव मोटार व कंटेनर यांचा समोरासमोर अपघात झाला. या अपघातामध्ये मनोजकुमार औटी याचा जागीच मृत्यू झाला. तसेच सागर रावसाहेब भुजबळ हा गंभीर जखमी झाला. जखमी सागर याला प्रथम ग्रामीण रुग्णालय न्हावरे येथे दाखल केले. त्यानंतर सिव्हिल हॉस्पिटल अहमदनगर येथे पुढील उपचारकामी पाठविण्यात आले.

अपघाताला कारणीभूत ठरल्याप्रकरणी दत्ता चांगदेव मोनवणे (रा. किनगाव, ता. अहमदपूर, जि. लातुर) या वाहन चालकाविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक कदम करत आहेत.

शिरुर तालुक्यात आता तांब्याच्या तारांऐवजी ॲल्युमिनियम तारा असणारी रोहित्रे !

तालुक्यात १०० विद्युत रोहित्रांना मंजुरी । आमदार ॲड.अशोक पवार यांची माहिती

शिरुर : प्रतिनिधी

गेल्या वर्षभरात शिरूर तालुक्यात साडेतीनशेहून अधिक विद्युत रोहित्रांची चोरी झाली असून त्यातून शेतकऱ्यांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागत होते, मात्र आता यावर मार्ग निघाला असून तांब्याच्या तारांऐवजी ॲल्युमिनियम तारा असणारे शंभर रोहित्र उपलब्ध झाले आहेत, त्यामुळे रोहित्र चोरीला मोठा आळा बसणार आहे. शिरूरमधून सुरू झालेला हा पथदर्शी प्रकल्प भविष्यात संपूर्ण महाराष्ट्रासाठी मैलाचा दगड ठरेल, अशी माहिती शिरूर -हवेलीचे आमदार अशोक पवार यांनी दिली.

तांब्याच्या तारा असलेली जुनी रोहित्रे बदलून त्या ऐवजी ॲल्युमिनियम तारा असलेली रोहित्रे बदलाचे काम सध्या न्हावरा आणि निमोने फिडर वरती सुरू आहे असे सांगून आमदार पवार म्हणाले,२२ केव्ही रोहित्रे ११ केव्ही मध्ये बदलण्याच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे. त्यासाठी नवीन १०० रोहित्रे मंजूर झाली आहेत, रोहित्रे चोरीच्या समस्येबरोबरच अतिरिक्त भारामुळे कमी दाबाने होणारा विद्युत पुरवठा ही नवीन रोहित्रांमुळे सुरळीत होणार आहे.

गुनाट, निमोणे, न्हावरा, आंबळे, शिंदोडी या गावांना याचा मोठा फायदा होणार आहे. नवीन रोहित्रे येण्यासाठी आठ-आठ दिवस लागत असल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होत असे शिवाय विजे अभावी संबंधित परिसरातील व्यवसायिकांना याचा मोठा फटका बसत होता या नवीन रोहित्रांमुळे अतिरिक्त लोड कमी करण्यासाठी मोठा फायदा होणार आहे. न्हावी येथील मल्लिकिर्जून फिडरवर हेच निमोणे उपकेंद्रावर सध्या युद्ध पातळीवर हे काम सुरू आहे.

टप्प्याटप्प्याने अशी नवीन रोहित्रे अजून उपलब्ध होणार असून भविष्यात संपूर्ण शिरूर तालुक्यात ही नवीन रोहित्रे बसविण्यात येणार आहेत. त्यासाठी संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा सुरू आहे, याबाबत या परिसरातील अनेक शेतकऱ्यांचे आभार मानणारे फोन येत असून शिरूर तालुक्यात हा पथदर्शी प्रकल्प यशस्वी झाल्यास भविष्यात तो संपूर्ण महाराष्ट्रात राबविला जाऊ शकतो, असे आमदार पवार यांनी यावेळी सांगितले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com